www.research-Chronicler.com

e-ISSN - 2347-503X
p-ISSN - 2347-5021



# Research Chronicler

## International Multidisciplinary Research Journal

Vol. VI Spl. Issue IV November 2018

: Executive Editor :
Dr. Manjushri Bobade

: Editor-In-Chief :
Dr. Sanjay Nagarkar

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | प्रा. डॉ. शिवलिंग मेनकुदळे | बदलती शैक्षणिक धोरणे आणि रयत शिक्षण संस्थेचे योगदान | 38 |
| 9 | डॉ. पांडुरंग भोसले व<br>डॉ. भानुदास शिंदे | कर्मवीर अण्णांचे जीवन व तत्त्वज्ञान | 44 |
| 10 | Sanjay Dattajirao Thorat | The Biographies of Karmveer Bhaurao Patil | 49 |
| 11 | Prof. Sunil S. Deokar | Vision of Dr. Karmaveer BhauraoPatil in 21st Century through *'Earn while you Learn'* | 51 |
| 12 | डॉ. संजय नगरकर | बदलती शैक्षणिक धोरणे आणि रयत शिक्षण संस्थेची धोरणे | 54 |
| 13 | डॉ. काशिनाथ जगन्नाथ सोलनकर | डॉ कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक विचार | 58 |
| 14 | प्रा. डॉ. कदम संतोष तुकाराम | कर्मवीर भाऊराव पाटील यांची वसतिगृह विषयक संकल्पना | 63 |
| 15 | डॉ. सीमा नाईक-गोसावी | रयत शिक्षण संस्थेची विवेकी वाटचाल | 66 |
| 16 | डॉ. वैशाली पाटील व<br>प्रा. नम्रता मेस्त्री | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य | 68 |
| 17 | प्रा. डॉ. सुभाष दिनकर आहेर | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची पत्रे: वाङ्मयीन व सामाजिक आकलन | 72 |
| 18 | डॉ. गणेश विष्णू लोखंडे | लोकसमूहाच्या निकोप सामाजिक आणि मानसिक आकारणात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे योगदान | 77 |
| 19 | प्रा. डॉ. शिवाजी एंडाईत | शरण संस्कारांची शिदोरी कमवा व शिका योजना | 81 |
| 20 | डॉ. यशोद श्रीमंतराव पाटील | कर्मवीरांचे जीवन चरित्र: एक विचार | 86 |
| 21 | प्रा. रेखा व्ही. इंगोले | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य | 90 |




Scanned by CamScanner

University Grants Commission, New Delhi Recognized Journal No. 41311
ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X

# ''कर्मवीर भाऊराव पाटील यांची पत्रे: वाङ्मयीन व सामाजिक आकलन''

**प्रा. डॉ. सुभाष दिनकर आहेर**

*सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, रयत शिक्षण संस्थेचे, राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर*

## १.१ प्रास्ताविक –

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख साधन आहे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील आदींचे शिक्षणविषयक कार्य अतुलनीय असे आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९ मध्ये काले येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाज, दलित, अस्पृश्य वर्ग शिक्षणापासून वंचित होता. त्यामुळे समाजात अज्ञान,अंधश्रध्दा , सावकारशाही, शोषण इ. प्रश्न मोठया प्रमाणात होते. संस्थेच्या विकासासाठी, ध्येयधोरणांच्या निश्चितीसाठी, आर्थिक मदतीसाठी, विद्यार्थ्यांवर स्वावलंबनाचे संस्कार व्हावेत, मदतीबदद्लची कृतज्ञता इ. हेतूने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी पत्रलेखन केले आहे. पत्रलेखनामागे निश्चित असा एक हेतू असतो, प्रयोजन असते.

## १.२ पत्रलेखन स्वरुप व इतिहास –

पंडित नेहरुंनी इंदिरा गांधीना तुरुंगातून पत्रे लिहिली होती. त्यातून इंदिरा गांधींमध्ये चिकित्सक व चौकस वृत्ती निर्माण झाली.''पत्र ह्रदयाच्या विभिन्न अंगांना उघडते. दोन व्यक्तींमधील स्नेहाचा, मैत्रीचा भावनांचा सेतू पत्राद्वारा बांधला जातो. पत्र हे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा आरसा आहे. पत्रातून मनोवृत्ती, विचारधारा प्रगती, आचार विचार, व्यवहार, रीती रिवाज, अभिलाषा, स्वार्थपरमार्थ, मनोगत, जीवनातील कसोटीचे प्रसंग इत्यादीचे चित्रण होते.''[१] प्राचीन काळापासून पत्रलेखनास एक परंपरा आहे. स्वामी विवेकानंदानी आपल्या सहकाऱ्यांना, हितचिंतकांना पत्रे लिहिली होती. त्यातून त्यांच्या अंत:करणातील हळवेपणा, निश्चयी वृत्ती यांचा प्रत्यय येतो. आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या पत्रलेखनातूनही सर्वधर्मसमभाव व त्यागाची शिकवण आणि तरुणांना प्रेरणा मिळते. रावसाहेब शिंदे यांनीही संवादपर्वाच्या पाच खंडातून त्यांचा पत्रव्यवहार प्रसिद्ध केलेला आहे. सर्व पत्रव्यवहार एक प्रकारचा सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक स्वरुपाचा इतिहासच आहे.पत्रलेखनातून तत्कालीन काळातील विविध घडामोडी, राजकीय, सामाजिक व शैक्षणिक घडामोडी यांचे दर्शन घडते. त्या काळातील जीवनपद्धती, मानवी स्वभाव यांचेही दर्शन घडते.

पत्रलेखन हे भावना व विचार व्यक्त करण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. ॲड. रावसाहेब शिंदे संवादपर्वाच्या मनोगतात म्हणतात,'पत्रलेखन हा माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला. पत्रातून संवाद साधणे मला मनोमनी भावत गेले.' त्यात मिळणारा आनंद पत्रलेखकालाच समजणार आणि त्याहीपेक्षा त्यातून निर्माण होणारे भावबंधनाचे नाते याचे मोल देखील त्यालाच जाणवणार माझ्या पत्रव्यवहारामुळे माझी जीवनसंस्कृती संपन्न झाल्याचे मला दिवसेंदिवस भावतच गेले.' पत्रवाचनातून आपणास प्रेरणा मिळू शकते. पत्रलेखन म्हणजे 'या ह्दयीचे त्या ह्दयी' अशी भावना व विचारांची देवाणघेवाण असते. पत्रातून लिहिणाऱ्याच्या अंत:करणाचे आणि भावभावनांचे दर्शन होऊ शकते. ''पत्रव्यवहार खरोखरच मानवी संस्कृतीचा अमोल ठेवा असल्याचे जाणवते. महात्मा गांधींनी केलेला पत्रव्यवहार हा प्रचंडच. गांधीजींचा मुक्काम ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी पोस्टाच्या यंत्रणेला एक तात्कालिक पोस्ट ऑफिसलाच उघडावे लागे.



Scanned by CamScanner